**MHRG060005382025**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३३३/२०२५**

**नि. २ /क**

## मा. श्रीम. एस. के. टोनपे, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पेण

## यांचे न्यायालयात

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : | **०६/०१/२०२५** |
| २) | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : | **०५/०५/२०२५** |
| ३) | खबर देणारे पोलीस स्टेशन | : | दादर सागरी पोलीस स्टेशन |
| ४) | आरोपीचे नाव व इतर माहीती | : | संभाजी जी. म्हसकर,<br>पत्ता. आंबेवाडी, कोलाड, रोहा. |
| ५) | अपराधाचा तपशिल | : | |

दि. ०६/०१/२०२५ रोजी ०९.५४ वाजण्याचे सुमारास तुम्ही तुमचे वाहन चालवित असताना मोटार वाहन कायद्याचे वेगवेगळ्या कलमांचे उल्लंघन केल्याने तुमचेविरुद्ध मोटार वाहन कायद्याचे वेगवेगळया वाहतुक युनिट मार्फत ई चलानद्वारे कारवाई करण्यात आलेली असून त्याचा एकूण दंड ५००/– रुपये प्रलंबित आहे. तुम्हाला वेळोवेळी प्रलंबित ई–चलान दंड भरण्याच्या सुचना देवून देखील तुम्ही दंड भरला नाही व त्यायोगे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १०८/१७७ खाली शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

ब. <u>कलम व अधिनियम</u> : **मोटार वाहन कायदा कलम १०८/१७७.**

**आरोपीचे प्रतिकथन :**

प्रश्न क्र. १ : तुम्हाला फिर्यादी पेपर्सच्या नक्कला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचून समजावून

सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबूल आहे.

.....................................

(आरोपीची सही / अंगठा) **आरोपीचे वकील**

आरोपीला माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत सुनावण्यात आला व तो त्यास कबुल आहे.

SANGITA KISANRAO TONPE
Digitally signed by SANGITA KISANRAO TONPE
Date: 2026.03.12 16:05:11 +0530

ठिकाण : पेण **(एस. के. टोनपे)**

दिनांक : १२/०३/२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पेण**

## न्यायनिर्णय

**(दिनांक १२/०३/२०२६)**

१. आरोपीला गुन्ह्याचा तपशिल समजून सांगितला असता, आरोपीने स्वतःहून गुन्हा कबुल केला, आरोपीला गुन्हा कबुल केलेवर शिक्षा होवू शकते अथवा दंड आकारला जावू शकतो असे सांगितले. आरोपीला परिणामांची जाणीव करुन दिली असता अशी खात्री होते की, आरोपीने गुन्हा स्वइच्छेने कबुल केला व होणा–या शिक्षेस अथवा दंड भरणेस तयार असल्याचे सांगितले. आरोपीने गुन्हा स्वइच्छेने कबुल केलेने त्याची कबुली ही स्वयंस्फुर्तीने असल्याचे समाधान होते, सबब त्याला कायदेशीररित्या शिक्षा देणे बंधनकारक आहे. त्यामुळे आरोपीस शिक्षेसंबंधी ऐकणेत आले.

२. आरोपीने गुन्हा कबुल केल्यामुळे त्याला शिक्षेविषयी ऐकण्यात आले. आरोपीने त्याचेवर दया दाखविण्यात यावी असे नमूद केले, कारण की, हा आरोपीचा प्रथम गुन्हा होता. तसेच तो यापुढे अशा प्रकारचा गुन्हा करणार नाही याची हमी दर्शविली. त्याचप्रमाणे आरोपीने

सांगितले की, त्याचेवर पूर्वी कसल्याही प्रकारचा गुन्हा प्रलंबित नाही.

३. सदरील गुन्ह्याचे संक्षिप्त स्वरुप बघता तसेच आरोपीने स्वइच्छेने गुन्हा कबुल केल्यामुळे आरोपीस दोषी ठरविण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी नामे **संभाजी जी. म्हसकर** यांस मोटार वाहन कायदा कलम १०८/१७७ या गुन्ह्याकामी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे व रक्कम रुपये ५००**/- (अक्षरी पाचशे रुपये मात्र)** दंडाची शिक्षा फर्माविण्यात येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास ०१ दिवस साधा कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

२. सदर न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीला मोफत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उद्घोषित करण्यात आला)

SANGITA KISANRAO TONPE

Digitally signed by SANGITA KISANRAO TONPE
Date: 2026.03.12 16:05:17 +0530

**(एस. के. टोनपे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पेण**

**ठिकाण : पेण**
**दिनांक : १२/०३/२०२६**